डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी),पुणे
(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे ४११००१
barti
दूरध्वनी क्र. ०२०-२६३४ ३६००/२६३३ ३३३० फॅक्स :०२०-२६३३ ३५९६
E-mail: dg@barti.in Website: www.barti.in

जा.क्र.बार्टी/पुणे/योजना विभाग/IBPS(०७)/२०२३-२४/ ४०७६ दि.२७/०७/२०२३

# Shortfall Documents Notification

Tender ID: 2023_SJASA_904870_1

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांच्याकडून अनुसूचित जातीतील युवक युवतींसाठी बँक, रेल्वे, एल. आय. सी. इ. व तत्सम पदाच्या पूर्व प्रशिक्षणासाठी महाराष्ट्र राज्यातील वाशीम जिल्ह्यामध्ये प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यासाठी तसेच प्रशिक्षण संस्थाची निवड करण्याकरिता ई-निविदा दिनांक १६/०५/२०२३ व १७/०५/२०२३ रोजी महाराष्ट्र शासनाच्या http://mahatenders.gov.in व http://barti.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. सदर निविदा धारकांनी जोडलेल्या कागदपत्रांचे तांत्रिक मूल्यामापन करताना असे आढळून आले की, निविदा धारकांनी तांत्रिक लिफाफ्यातील निकषांच्या आवश्यकतेनुसार कमी/अपूर्ण कागदपत्रे सादर केली आहेत. त्याअनुषंगाने महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय दि.१७/०९/२०१९ नुसार तांत्रिक समितीने खालील तपशिलानुसार कागदपत्रे ऑनलाईन सादर करण्यासाठी खालील निविदा धारकांना सूचित करण्याचा निर्णय घेतला आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नाव | कमी/अपूर्ण कागदपत्रे |
|---|---|---|
| १ | प्रसंग मागासवर्गीय समाज कल्याण संस्था | १. मागील पाच वर्षात बँक, रेल्वे, एल. आय. सी. इ. मध्ये नोकरीच्या संधी प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांची यादी,विद्यार्थ्यांचे प्रवेश अर्ज, विद्यार्थ्यांचे नियुक्ती पत्र जोडलेले नाहीत.<br>२. ५०० Sq.Ft क्षेत्रफळ याप्रमाणे ३ हॉल असल्याचे पुरावे/ छायाचित्रे जोडलेली नाहीत.<br>३. अद्यावत पुस्तक संच यादी जोडलेली नाही.<br>४. संस्थेची वेबसाईट असल्याबाबत पुरावा जोडलेला नाही.<br>५. Wi-Fi सुविधा असलेबाबत पुरावा/ छायाचित्र जोडलेले नाही.<br>६. स्पर्धा परिक्षा ग्रंथालय, अद्यावत पुस्तक संच, वृत्तपत्रे, मासिके पुराव्यासह छायाचित्रे व यादी जोडलेले नाही.<br>७. स्वतंत्र अभ्यासिका मध्ये विद्यार्थी बैठका क्षमता नमूद केलेली नाही.<br>८. सी.सी.टी.व्ही. यंत्रणा असलेबाबत पुरावे जोडलेले नाहीत<br>९. आधार संलग्न बायोमेट्रिक सुविधा असलेबाबत पुरावे जोडलेले नाहीत.<br>१०. तज्ञ व्याख्याते/ प्रशिक्षक यांचे बायोडेटा, नियुक्ती पत्रे जोडलेली नाहीत. |

| | | |
|---|---|---|
| | | ११. Turnover Certificate जोडलेले नाही.<br>१२. संस्था प्रमुख/संस्थेचे अध्यक्ष/सचिव/सदस्य यांचे अनुसूचित जातीतील प्रमाणपत्र असेलेले पुरावे जोडलेले नाहीत.<br>१३. संगणक Lab मध्ये संगणक संख्या, विद्युत बॅकअप, ऑनलाईन टेस्ट सिरीज, याबाबत काहीही नमूद केलेले नाही तसेच छायाचित्रे जोडलेली नाहीत.<br>१४.प्रशिक्षण हॉलमध्ये Interactive Board व Audio Video ची सुविधा असल्याबाबतची छायाचित्रे जोडलेली नाहीत. |
| २ | स्व.कुसुमताई दळवी बहुउद्देशीय संस्था वाशिम द्वारा संचलित तक्षशिला अकॅडमी | १. Turnover Certificate जोडलेले नाही. |

उपरोक्त नमूद ई-निविदा धारकांनी तक्त्यात नमूद केल्यानुसार आवश्यक कागदपत्रे योग्य स्वरुपात व सुस्पष्ट दस्त ऑनलाईन पोर्टल http://mahatenders.gov.in वर दिनांक ०७/०८/२०२३ दु.१२.०० पर्यंत सादर करावी. सदर मुदतीनंतर कमी/अपूर्ण कागदपत्रे सादर करण्यासाठी अन्य कोणत्याही संधीचा अथवा वाढीव मुदतीचा विचार करण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

विभाग प्रमुख
डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व
प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे

मा.महासंचालक यांचे मान्यतेने